शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – १.
यांचे कार्यालय.
दिनांक :- 10 OCT 1991

प्रति,

सचिव,
उत्कर्ष शिक्षण संस्था,
वरवंड, ता. दौंड

विषय :- सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :- मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, यांचेकडील पत्र क्रं. एसएसएन/१९९१/२७६४/माशि-१ दि. २४ ऑगस्ट १९९१ चे पत्र.

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९१ पासून विना-अनुदान तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यांत येत आहे.

[१] या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रं. एसएसएन १०८८/१६६९-एन/माशि-१ दिनांक १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी. च्या] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र विधोत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

२/-

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून शासनाने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशा वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशनफीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यांत येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४२. ३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी, शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

१] संबंधीत संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्हीही अधिनियमा खाली नोंदणे आवश्यक आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] ज्या संस्थांना परवानगी आदेश मिळाल्यानंतर शाळा सुरु करणे शक्य होणार नाही. अशा संस्थांनी १९९२-९३ पासून नूतनीकरणाबाबत डिसेंबर ९१ पूर्वी शिक्षणाधिकारी व या कार्यालयामार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

त्या शाळेची फी एक जरी डाव आरक्त संस्थेच्या विरोधात आल्यास दिलेली परवानगी आगाऊ रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ. नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | उत्कर्ष शिक्षण संस्था, वरवंड, ता. दौंड | कुसेगांव ता. दौंड | ८ वी जून ९१ पासून | मराठी. |

आपल्या शाळेस आल्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमा ? ३. नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १.

प्रतिलिपी..

शिक्षणाधिकारी [माध्य] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुद्ध तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-याकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांना माहितीसाठी सादर.

संदीप/५१०२१.